जगभर

# पर्यावरणावरील नवे अत्याचार

## चन्द्रशेखर पुरन्दरे

ब्राझीलचा नवीन अध्यक्ष बोल्सनरो अमेझॉन खोऱ्यातील जंगलतोड अमान्य करत आहे. दुसरा अत्याचार म्हणजे रशियात एक संशयित अणुस्फोट झाला.

**ब्राझील** : अमेझॉनच्या खोऱ्यात जगातील ४० टक्के जंगल आहे आणि पशु-पक्ष्यांच्या १० ते १५ टक्के जाती आहेत. हे वैविध्य आता ब्राझीलच्या नव्या अध्यक्षांच्या अदूरदृष्टीने धोक्यात आहे. अशी वेळ लवकरच येऊ शकते की संपूर्ण जंगलाचे परिवर्तन प्रचंड कुरणात होईल आणि परत जंगल येणे अशक्य होईल. अध्यक्षांचा दावा असा की ब्राझीलच्या 'विकासा'साठी जंगलतोड आवश्यक आहे. वस्तुत: कायदा आणि सुरक्षा या मुद्द्यांवर हा अध्यक्ष निवडून आला. जंगलतोड बेकायदेशीर असते. तिच्याविरुद्ध कारवाई करण्याऐवजी ती न्याय्य आहे हे धोरण स्वीकारणे चूक आहे.

धरणे , रस्ते बांधणे, खाणकाम, बेजबाबदार लाकूडतोड, सोयाबीनची लागवड यामुळे गेल्या पन्नास वर्षांत ब्राझीलच्या १७ टक्के जंगलाचा विनाश झालेला आहे. अमेझॉन जंगलाचे वैशिष्ठ्य म्हणजे त्यात पाण्याचा नैसर्गिक पुनर्वापर होतो. जंगलतोड वाढली की हा पुनर्वापर खंडित होतो. या बेछूट जंगलतोडीमुळे गेल्या पंधरा वर्षांत अमेझॉन क्षेत्रात तीन गंभीर दुष्काळ आले आणि वणवे वाढत आहेत. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात अमेझॉनमध्ये परत प्रचंड वणवा सुरु झाला. तो आतापर्यंतचा सगळ्यात मोठा असावा. हा वणवा काबूत आणू शकेल अशी यंत्रणा सरकारकडे नाही असे अध्यक्षांचे म्हणणे.

अध्यक्षांचा दावा असा आहे की हा ब्राझीलचा अंतर्गत मामला आहे, त्याची इतरांनी दाखल घेऊ नये. वस्तुत: ब्राझील शेजारच्या सात देशांचा भूभाग या खोऱ्यात येतो. [व्हेनेझुएला, कोलंबिया, पेरू, इत्यादी.] म्हणजे, अमेझॉनचा ऱ्हास हा केवळ ब्राझीलचा देशान्तर्गत प्रश्न नाही.

अध्यक्षाचे दुसरे म्हणणे म्हणजे आज जे विकसित देश ब्राझीलवर टीका करत आहेत, त्यांनी स्वत:च्या देशांत अतोनात जंगलतोड करूनच विकास साधला आहे. ही भूमिका म्हणजे एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारणे आहे. त्या देशांची नक्कल करण्याऐवजी त्यांच्या इतिहासातील चुका कशा टाळता येतील हे पहाणे आवश्यक आहे. हे भान या राजकीय नेतृत्वाला दिसत नाही.

दरम्यान २३ जुलैला एमरीया वाजेपी नावाच्या अमेझॉनमधील आदिम जमातीच्या प्रमुखाचा खून झाला. वाजेपी जमातीला राखीव क्षेत्र आहे. तेथे ते पिढ्यांपिढ्या रहात आलेले आहेत. या क्षेत्रात सोन्याची खाण विकसित करण्याचा उद्योजकांचा प्रयत्न आहे. प्रत्यक्षदर्शी असे सांगतात की खाण प्रकल्पाशी संबंधित बाहेरचे बरेच जण त्यांच्या रक्षित जमिनीवर आले. त्यांनी एमरीयाचा भोसकून खून केला. खाणी, लाकूडतोड आणि व्यापारी शेती यांचे वन-क्षेत्रावर तेथे अतिक्रमण होत आहे. त्याचा हा हिंसक भाग. या लोकांचे अस्तित्व - उपजीविका आणि ज्ञानव्यवस्था - अशा प्रकल्पांनी धोक्यात येते. प्रकल्पाच्या विरोधकांना काय उत्तर मिळेल हे या घटनेने दाखवले आहे. सरकारने कडक कारवाई केली तरच हा दहशतीचा संदेश पोचणे टळू शकेल. ती कारवाई असंभव दिसते. या घटनेची दखल संयुक्त राष्ट्रसंघाने घेतली. भूमिपुत्रांचे संरक्षण ही जागतिक समस्या आहे आणि ब्राझीलचे सरकार आपली जबाबदारी टाळू शकत नाही हे स्पष्ट केले.

या प्रश्नाचे जागतिक गांभीर्य लक्षात घेऊन अमेझॉन खोरे वाचवण्यासाठी आंतरराष्ट्रीय उपाययोजना सुरु झाली. त्याअन्वये अमेझॉन न्यास स्थापन करण्यात आला. पण सरकारची त्यातील ढवळाढवळ व अमेझॉन सुरक्षित राखण्याची अनिच्छा पाहून जर्मनी व नॉर्वे या यातील मोठ्या देणगीदारांनी त्यांचा आर्थिक सहभाग जुलैपासून काढून घेतला. 'ब्राझीलला त्यांची जरुरीच नाही' असे बोल्सनरोचे प्रतिपादन.

विशेष म्हणजे ब्राझीलच्या स्वत:च्या अंतरिक्ष संशोधन संस्थेने उपग्रहांच्या फोटोंवरून असे सिद्ध केले की अमेझॉनचे जंगल खरोखर आक्रसत आहे. हा अहवाल प्रसिद्ध होताच बोलसनरोने हा अहवाल खोटा आहे असे जाहीर

केले! त्या संस्थेच्या अध्यक्षाला राजीनामा द्यायलाही भाग पाडले.

जगातील १५० कोटी लोक अन्न, इंधन, लाकूड आणि श्रद्धास्थान म्हणून जंगलांवर अवलंबून असतात. उरलेले ६२० कोटी प्रामुख्याने पर्यावरण संतुलित राहावे यासाठी अप्रत्यक्षरीत्या जंगलांवर अवलंबून असतात. या पार्श्वभूमीवर हा उद्धटपणा पहावा.

**रशिया** : ऑगस्टच्या सुरुवातीला रशियाच्या उत्तरेत एक अपघात झाला. अपघात नक्की कोठे झाला व कसा झाला, त्याची तीव्रता, मृतांची संख्या या सगळ्याच गोष्टींबद्दल सुरुवातीपासून संदिग्धता आहे. जगातील बहुतेक देशांत अशा प्रकारचे लष्करी अपघात आधी दाबून ठेवण्याचा प्रयत्न असतो. त्यात रशियात सरकारी नियंत्रण अधिकच असल्याने स्थानिक प्रसारमाध्यमांना अशी वार्ता देण्याचा फारसा वाव नसतो. जी काही बातमी बाहेर येईल ती 'अधिकृत', सरकारमान्य असते. पण विकसित तंत्रज्ञानामुळे असे अपघात लपून रहात नाहीत. [रशियात २००० साली एका लष्करी पाणडुबीच्या अपघातात बोटीवरचे सगळे ११८ लोक दगावले होते. तेव्हाही प्रथम हाच पवित्र होता, नक्की काय घडले हे सांगायला सरकारने सात वर्षे घेतली.]

अलीकडचा अपघात एका लष्करी कारखान्यात झाला असे आधी सांगण्यात आले. नंतर तो एका लष्करी जहाजावर झाला असे सांगण्यात आले. प्रथम मृतांची संख्या दोन होती, मग पाच, मग ती सातवर गेली. रशियाच्या क्षेपणास्त्रे बनवण्याच्या कारखान्यात किंवा क्षेपणास्त्रे वाहक जहाजावर एक रॉकेट किरणोत्सर्गी इंजिनावर आदळले असे एक वर्णन. दुसरे वर्णन म्हणजे ते रॉकेटच किरणोत्सर्गी इंधन वापरत होते. स्फोटामुळे इंधनाचा तो टँक फुटला आणि किरणोत्सर्ग झाला. म्हणजे, हा अपघात नुसता एका रॉकेटचा स्फोट होण्याचा नव्हता.

प्रथम किरणोत्सर्ग झालाच नाही अशी लष्कराची भूमिका होती, नंतर किरणोत्सर्ग झाला पण तो मानवी व अन्य जीवांना धोकादायक पातळीच्या खाली होता असे वर्णन होते. [हाही क्रम चेर्नोबिलमध्ये बघायला मिळाला होता.] पण जवळच्या एका शहरातील मोजमापानुसार काही काळासाठी किरणोत्सर्ग धोकादायक पातळीच्या वर पोचला. या अपघाताच्या जवळचे एक खेडे निर्मनुष्य करण्यात आले. स्थानिक लोकांनी आयोडीनचा साठा करायला सुरवात केली. [आयोडीन किरणोत्सर्गी अपायांविरुद्ध अल्पशी मदत करते.] रशियाच्या वेधशाळेनुसार किरणोत्सर्ग मान्य पातळीच्या चार ते सोळा पट जास्त झाला. म्हणजे रशियातीलच स्थानिक वृत्त, इतर केंद्रीय संस्था आणि लष्कर यांचे वृत्त एकमेकांविरुद्ध होते. किरणोत्सर्ग मानवी शरीर तर रोगी करतेच पण तो पाण्यापर्यंत पोचतो आणि आणखी धोकादायक होतो. म्हणून घटनेचे गांभीर्य.

शेजारच्या नॉर्वे देशातील किरणोत्सर्गाचा अभ्यास करणाऱ्या संस्थेनुसारही किरणोत्सर्ग बराच धोकादायक होता. मुळात हे रॉकेट अणु-ऊर्जा प्रकल्पापर्यंत किंवा कारखान्यापर्यंत पोचलेच कसे हे गूढ आहे. त्यामुळे कदाचित अपघात जहाजावरच झाला असावा असा अंदाज आहे.

सगळ्या सरकारी गोपनीयतेचे प्रमुख कारण म्हणजे रशिया अमेरिकेशी स्पर्धेत शस्त्रास्त्रांबाबत तुल्यबळ होऊ इच्छितो. अशी क्षेपणास्त्रे निर्माण करायची की जी लांब पल्ल्याची असतील आणि त्यांच्या प्रवासात अमेरिका ती क्षेपणास्त्रे वेधू शकणार नाही. हा पुतीनचा अट्टाहास आहे. म्हणून गुप्तता. गुप्ततेचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, हे प्रकल्प अतोनात महाग असतात. या व्यर्थ खर्चापेक्षा जीवनमान वाढवावे, टंचाई दूर करण्यात सरकारने पैसा व्यतीत करावा अशी कोणत्याही देशातील सामान्य नागरिकांप्रमाणे रशियन सामान्य माणसाची इच्छा असते. म्हणून ते प्रकल्प गुप्त ठेवायचे. अर्थातच या अपघातांची वाच्यता होणे सरकारला गैरसोयीचे ठरते. अशा प्रकरणामुळे ती झालीच तर असे अपघात कोठेही होतात - अमेरिकेत झालेले आहेत, जपानमध्ये झालेले आहेत - अशी भलावण केली जाते. त्याहून धूर्त स्तरावर यात बळी पडले ते हुतात्मा झाले असा देशभक्तीचा मुलामा दिला जातो. [यातील बळींना मरणोत्तर सरकारी पारितोषिके अपेक्षित आहेत.] पुतीनने G-7 या ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यातील सात राष्ट्रांच्या संमेलनात अपघात क्षुल्लक होता हीच री ओढली.

**निरीक्षण** : ब्राझीलसारखी निर्वाचित लोकशाही अमेझॉन खोऱ्याची होणारी हानी तद्देशीयांच्यापासूनच लपवून ठेवते तर रशियासारखी एकाधिकारशाही भ्रामक देशाभिमानापोटी सामान्य जीवन बेमुर्वतपणे धोक्यात टाकते. खरा प्रश्न लोक विरुद्ध सरकार दिसतो, व्यवस्था कोणती हा दिसत नाही.

art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk